Kisan Shikshan Prasarak Mandal,
Borgoan (Kale) Tq. & Dist. Latur's

**NAAC Accredited 'B' Grade**



# Vasantrao Kale Mahavidyalaya,
## Dhoki. Tq & Dist - Osmanabad.

&

## Akhil Maharashtra Itihas Parishad, Pune

Jointly Organize

## One Day International Conference on

# "The History of Pandemic like Covid-19 & Its Impat on Socio-Economic & Political Sectors in the World"

**Tuesday, 20th October 2020**


ISSN No. : 2278-9308
Impact Factor : 7.675



Editor
Dr. N. P. Manale
(Convenor)

Chief Editor
Dr. Satish Kadam
(President, AMIP)

Executive Editor
Dr. Haridas Fere
(Principal)


Organized by

**Department of History**
Kisan Shikshan Prasarak Mandal, Borgoan (Kale) Tq. & Dist. Latur's
**VASANTRAO KALE MAHAVIDYALAYA, DHOKI**
Tq & Dist.- Osmanabad - 413508

Scanned by CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 252 (CCXLII)
ISSN : 2278-9308
September, 2020


| | | |
|---|---|---|
| 36 | कोरोना एक पर्यावरणीय आपत्ती डॉ.शेख ए.आय. | 136 |
| 37 | कोरोना महामारीमुळे जागतिक मानव जातीवर झालेला सामाजिक परिणाम प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड | 139 |
| 38 | होय, व्यायामाने कोरोनावर मात करणे शक्य प्रा. डॉ. भास्कर माने | 143 |
| 39 | कोविड-१९ महामारीचा भारतीय व जागतिक अर्थव्यवस्थेवरील परिणाम डॉ. सुहास आव्हाड / घोलप के.एस. | 147 |
| 40 | कोरोना विषाणूचा वाढता प्रादूर्भाव, बिघडलेले मानसिक स्वास्थ्य आणि उपाययोजना प्रा. डॉ. सुनिता वाटोरे | 152 |
| 41 | कोरोना काळातील मानसिक आरोग्याची काळजी प्रा.डॉ.शिवराज पाटील | 156 |
| 42 | कोविड – १९ महामारीचा इतिहास सुरक्षितता व उपाय डॉ. प्रशांत साबळे | 160 |
| 43 | माझे कुटुंब माझी जबाबदारी : मोहीम राबविणे आजच्या काळाची प्रमुख गरज प्रा.डॉ. घोडके यादव रावसाहेब | 163 |
| 44 | *स्त्री अस्मिता, मीडिया और बाजार डॉ.देशमुख मनीषा बालासाहेब* | 167 |
| 45 | कोविड – १९महामारी का इतिहास डॉ. सिरसट पी.बी. | 171 |
| 46 | कोरोना, सुशांतसिंहची आत्महत्या आणि ड्रग्ज कनेक्शन डॉ. भुजंग पाटील | 174 |
| 47 | Covid-19 चा समाजावर झालेला परिणाम प्रा.डॉ.मोटे गीतांजली सदाशिवराव | 177 |
| 48 | Covid-१९ महामारी आणि तिचे सामाजिक संस्थांवर झालेले बदल व त्यांच्यापुढील आव्हाने : एक सामाजिक अध्ययन. गायकवाड पी.के. | 182 |
| 49 | कोविड–१९ महामारी काळात महिला बचतगटांवर झालेला परिणाम (विषेश संदर्भ उस्मानाबाद जिल्हा) स्वामी विरभद्रेश्वर सामलिंग | 186 |
| 50 | Covid-19 चे सामाजिक जीवनावरील परिणाम प्रा.अशोक रामचंद्र गोरे | 189 |




Scanned by CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 252 (CCXLII)
ISSN : 2278-9308
November 2020

# कोरोना महामारीमुळे जागतिक मानव जातीवर झालेला सामाजिक परिणाम

प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना:**

संपूर्ण विश्‍वावर आघात निर्माण करून मानव जातीला जगण्यास हतभल करणारा महाभयंकर रोग म्हणजे कोरोना असून या रोगाची खरी उत्पत्ती कोठून झाली हे जरी सांगणे अवघड असले तरी हा रोग सध्याच्या २१ व्या शतकात सन २०१९ मध्ये चीन आणि २०२० मध्ये संपूर्ण जगातील वेगवेगळया देशात व त्या–त्या देशातील प्रदेशात तिव्र स्वरूपात वाढून सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी फार मोठे आव्हान म्हणून पुढे आलेले आहे. खरे तर भारतातील संपूर्ण समाजव्यवस्था ७० वर्षानंतर जेमतेम विकासाच्या मार्गानी मार्गक्रमण करीत असतांनाच आर्थिक चक्र या कोराना महामारीमुळे संपूर्ण बदललेले असल्याचे दिसून येते. भारतातील समाजव्यवस्थेचा जवळून अभ्यास केल्यास असे लक्षात येईल की, समाजामध्ये फार मोठी निराशा या ७ ते ८ महिनाच्या काळामध्ये झालेली दिसून येते. कारण की, भारतातील ६० ते ७० टक्के लोक आजही शेती, शेतमजूर, लघू उद्योग, हंगामी कामगार, उदरनिर्वाहासाठी भटंकती करणारे कामगार, नियमितपणे स्थलांतर करणारे कामगार अशा अनेक लहान लहान समूहाचे जीणे अवघड झाले आहे. अनेक दशकापूर्वी जागतिक माहामारी आलेली आहे, परंतु संपूर्ण समाजाची दिशा मोडकळीस आणणारी परिस्थिती आजपर्यंत निर्माण झालेली दिसून येत नाही. म्हणून या २१ व्या शतकातील कोरोना प्रार्दूभावामुळे निर्माण झालेल्या महामारीचे सामाजिक परिणामांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. जागतिक ग्रामीण जीवनावर महामारीमुळे झालेला सामाजिक परिणाम अभ्यासणे.
२. जागतिक शहरी जीवनावर महामारीमुळे झालेला सामाजिक परिणाम अभ्यासणे.
३. सेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती जीवनावर झालेला सामाजिक परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :**

सामाजिक शास्त्रात शोधनिबंध हा संशोधनाचा एक महत्वाचा अंग असतो. कारण की, शोधनिबंधात संशोधन समस्या निश्‍चित करून त्या समस्येची कारणमीमांसा केली जाते. संबंधित शोध निबंधात वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला जाणार आहे. यामध्ये प्राथमिक माहिती ही स्वत: संशोधकांनी अनुभवलेली माहिती तसेच जनसंपर्क माध्यमे, मासिके आणि वृत्तपत्रांचा वापर करण्यात आला आहे. तसेच ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध ज्ञानाचा अथवा माहितीचा आधार घेवून शोध निबंध सादर करण्यात येणार आहे.

**ग्रामीण जीवनावर कोरोना माहामारीमुळे झालेला सामाजिक परिणाम :**

कोरोना या महाभंयकर रोगामुळे संपूर्ण देशाची समाजव्यवस्था विस्कळित झालेली दिसून येते. यामध्ये जागतिक पातळीवरील परिस्थितीचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, दऱ्याखोऱ्यातील आदिम समुदाय व ग्रामीण–नागरी समुदायातील तळागाळातील हातावर मोल–मजुरी करणाऱ्या, कष्टकरी वर्गावर तसेच अहोरात्र शेतीशी इमान राखणाऱ्या शेतकऱ्याची अतोनात अशी दयनीय अवस्था कोरोना महामारीमुळे निर्माण झालेली आहे. ग्रामीण भागातील खेडे, वाडी, वस्ती व इतर अन्य ठिकाणी आपले छोटे समूह करून राहणाऱ्या, हातावरचे जीवन



Scanned by CamScanner

जगणाऱ्या, दैनंदिन जीवन जगण्यासाठी दारोदारी भंटकती करणाऱ्या तमाम भटके जाती समूह तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या अन्य लोक समुदायाची अत्यंत वाईट परिस्थिती कोरोनाच्या प्रार्दुभावामुळे निर्माण झालेली दिसून येते.

ग्रामीण जीवन पध्दतीवर कोरोनामुळे निश्चितच सामाजिक परिणाम झालेला असला तरी आज संपूर्ण जगातील शाळा, महाविद्यालये तसेच सर्व शैक्षणिक संस्था बंद असल्यामुळे शिक्षण घेणारा घटक हा संपूर्णपणे एकाच ठिकाणी स्थिर झालाल्यामुळे देखील समाजातील या घटकाला सामाजिक परिणामाचे चटके सहन करावे लागत आहे. मग तो घटक ग्रामीण असो अथवा नागरी जीवन पध्दतीचे अंगिकार करणारा. सध्या भारतातील नव्हे तर जगातील प्रत्येक देशासमोर कोरोना या महामारीमुळे शिक्षण क्षेत्रासाठी फार मोठे आव्हान असल्याचे दिसून येत आहे. याला ग्रामीण समुदाय देखील अपवाद नाही.

ग्रामीण समुदायामध्ये मानवी जीवनावर सामाजिक परिणाम झालेला दिसून येतो. भारतीय समाजाचा अभ्यास समोर ठेवल्यास असे लक्षात येते की, प्रत्येक समाजातील आणि धर्मातील देखील सर्व विधी, संस्कृती आणि इतर सर्व कार्यात समुदायातील लोक हे एकत्र येत होते. परंतु कोरोना प्रार्दुभावामुळे प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये एकच भिती निर्माण झाली असून आज कोणीही कोणासाठी सहकार्य करण्यास तयार नसल्याचे दिसून येते. अनेक वेळेस असे दिसून येत आहे की, गाव, वाडी, वस्तीतील एखाद्या व्यक्तीला कोरोना आहे असे माहिती मिळालयास त्या व्यक्तीला व कुटुंबाला कोणतेही सहकार्य करण्याची तयारी नाही तसेच कोरोनामुळे मृत्यू झाल्यास त्या कुटुंबाला वाळीत टाकल्यासारखे केल्या जात आहे. अशा प्रकारची सध्याची समाजरचना दिसून येत आहे. यामुळे तशा प्रकारच्या कुटुंबावर निश्चितच सामाजिक दडपण निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. कोरोना या महामारीमुळे सध्या गाव, वाडी, वस्ती, तांडा ते शहर एकाच कारणामुळे घाबरून समाजामध्ये सामाजिक विषमता निर्माण होत चाललेली दिसून येत आहे. कोरोना महामारीमुळे ग्रामीण समाजातील प्रत्येक सामाजिक व्यवहार हे अगदी दुरावा निर्माण करून एकसंघ समाजामध्ये दुफळी निर्माण करण्याचे कार्य झाल्यासारखे वाटत आहे. कारण की, अनेक वेगवेगळया जाती जमातीत विवाह संस्कार असेल किंवा अन्य सांस्कृतिक प्रकार असेल यामध्ये एकोप्याची भावना दिसून येईल. परंतु या कोरोना परिस्थितीत आपले देखील परके होत असताना दिसून येत आहे. यामुळे समूहा–समूहाअंर्तगत सामाजिक सलोख्याचे वातावरण पुरेसे दिसून येत नसल्यामुळे इतर कुटुंबावर त्यांचा सामाजिक परिणाम होत असलेला जाणवत आहे.

वैश्विक पातळीवर ग्रामीण समुदायातील शेती संबधित व्यवसायावर महामारीचा परिणाम झालेला आहे, तसेच शेती क्षेत्रातील उत्पादन व्यवस्थेवर देखील याचा परिणाम दिसून येत आहे. यामुळे ग्रामीण समाज जीवनावर सामाजिक परिणाम होत असलेले दिसून येत आहे. शासन आणि सरकार एका बाजूला आर्थिक अडचणीत सापडलेला असून यामुळे शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे हमी भाव कोणत्याही मालाला मिळत नसलेला दिसून येते, त्यामुळे महामारीच्या काळात देखील भारतीय समाजव्यवस्थेत शेतकरी आत्महत्या होत असतांना दिसत आहेत. समग्र समाज व्यवस्थेच्या परिवर्तनासाठी शासन आणि सरकारने आमुलाग्र परिवर्तनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यामुळे कोरोना महामारीच्या आव्हानांला तोंड देवून समग्र समाजात विकासात्मक परिवर्तनाची दिशा निर्देशित करून समाजातील सामाजिक परिणामाची तिव्रता कमी करण्याचे प्रयत्न करणे क्रमप्राप्त ठरते.

शहरी जीवनावर महामारीमुळे झालेला सामाजिक परिणाम :

जागतिक जीवन पध्दतीचा कोरोना महामारीच्या काळातील आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, प्रथम शहरी समुदायावर कोरोनाचा आघात झालेला आहे, त्यामुळे ग्रामीण समुदायापेक्षा आजही मोठया प्रमाणात शहरी समुदाय जोखीम स्विकारून आपले दैनंदिन जीवन पार पाडत असलेले दिसते. ग्रामीण समाजव्यवस्थेतील विषमतेपेक्षा मोठया प्रमाणात आज शहरी समाजात विषमता वाढलेली दिसून येते. कारण आजच्या परिस्थितीत प्रत्येक घराघरातून कोरोना पासून बचाव करण्यासाठी सर्वेतोपरी प्रयत्न केले जात आहे. परंतु तरी देखील शहरी



Scanned by CamScanner

समुदायात कोरोनामुळे अनेक लोकांना आपले जीव गमवावे लागले आहे. यामध्ये कोरोनाच्या रोगाची लागन इतरांना झाल्यामुळे प्रत्येक देशातील लोकांना आपले जीव गमवावे लागले आहे. एवढेच नव्हे तर यामध्ये कोरोनापासून बचाव करण्यासाठी मानवी जीवनाच्या कल्याणासाठी, अथवा प्रत्येक कोरोना बाधितांच्या जीवाला धोका होवू नये म्हणून आपले जीव धोक्यात घालणारे, मानव सेवा करणारे डॉक्टर्स, नर्स, पोलिस कर्मचारी, नगरपालिका, महानगरपालिका जिल्हा प्रशासन कार्यालयातील कर्मचारी, स्वयंसेवक, स्वयंसेविका, अशा वर्कर अशा प्रकारे अनेक घटक आहेत जे की, मनुष्य जीवाला या महाभयंकर रोगापासून वाचविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत. अत्यंत दुःखाची बाब म्हणजे या सेवेकरी वर्गातील व्यक्ती देखील कोरोनाची लागन झाल्यामुळे आपले जीव धोक्यात घालून सेवा देत असतांनाच आपले प्राण सुध्दा त्यांना गमवावे लागले आहेत. यामध्ये अनेकांचे मृत्यू हे कोरोनाची लागण झाल्यामुळेच झालेले आहे. अशा परिस्थितीत अहोरात्र सेवा करणाऱ्या सेवेकरी वर्गाच्या कुटंबीयांची सामाजिक परिस्थिती लक्षात घेतले तर अत्यंत वाईट अवस्थेत ते जगत असल्याचे दिसून येईल, कारण की, कुटुंब प्रमुख हा सेवेत पूर्ण वेळ देत असल्यामुळे स्वतःच्या कुटुंबाची मात्र परिस्थिती अडचणीची झालेली दिसून येते. एका बाजूला समाज आपल्या पासून दूर जात असलेला अनुभव आणि दुसऱ्या बाजूला आपल्या घरचे मानसं इतरांसाठी अहोरात्र सेवा देत असतांना कोरोना प्रार्दूभावाची लागण होण्याची फार मोठी भिती त्या कुटुंबियाच्या मनात घर करून राहत असलेले दिसून येत आहे. अशा वेळी त्या कुटुंबीयांच्या सदस्यांवर सामाजिक परिणाम हळूहळू होत असताना दिसून येते.

कोरोना महामारीमुळे मानवी जीवनाची फार मोठी हानी झालेली आहे. हे वर्ल्ड हेल्थ ऑरगोनॉझेशन च्या अधिकृत संकेत स्थळावरून २६ सप्टेंबर २०२० ची जागतिक आकडेवारी घेतल्यास लक्षात येते. साधारणपणे ३,२७,३०,९४५ ही कोरोना बाधीतांची संख्या असून कोरोनामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या ९,९१,२२४ इतकी आहे. ही सर्व आकडेवारी जगातील २३५ देश आणि त्या देशातील वेगवेगळया प्रदेशातील आहे. यामध्ये ग्रामीण–शहरी लोक समुदाय व अत्यंत तातडीने सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा देखील समावेश आहे. आज कोरोनामुळे मृत्यूंचा आकडा लक्षात घेतल्यास हे स्पष्ट दिसून येते की, लाखो कुटुंबाला आपल्या घरातील सदस्य, कुटुंब प्रमुख या महामारीमुळे गमवावे लागले आहे. यामुळे कुटुंबाला फार मोठे दुःख झाले असून या परिस्थितीत आपल्या जवळचे नातेवाईक देखील आपल्या पासून दूर झालेले आहेत. तेव्हा त्या कुटुंबावर सामाजिक ताण–तणाव निर्माण होतो. सध्याच्या परिस्थितीत तर कोरोनाचा सामुदायिक प्रसार होत चाललेला दिसून येत आहे. शहरी समुदायातील तिव्र वाढी बरोबरच ग्रामीण समूदायात देखील झपाटयाने कोरोनाची लागण होत असलेले दिसून येते. या महाभंयकर रोगावर सरकार व शासनाच्या माध्यमातून वेळीच निर्बंध घालणे, ठोस असे उपाय करणे, तातडीने लसीकरणाची व्यवस्था निर्माण अत्यंत गरजेचे आहे.

**सेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती जीवनावर झालेला सामाजिक परिणाम :**

कोरोना व्हायरसला पायबंद घालण्यासाठी सर्वात प्रथम स्वतःचे जीव धोक्यात घालून मानवी सेवा करणारे सर्व वैधकीय दवाखान्यातील डॉक्टर्स, नर्स, परिचारीका, आशा वर्कर्स, पोलिस दल, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा प्रशासनातील सर्व कर्मचारी यांनी अहोरात्र मेहनत कष्ट करून मानवी जीवनाच्या कल्याणासाठी म्हणजे लाखो लोकांच्या जीवाला धोका होवू नये म्हणून स्वतः तत्परतेने सेवा देणारे भारतीय आणि जागतिक कर्मचारी यांची फार मोठी भुमिका या कोरोनाच्या काळात ठरलेली आहे. समग्र वैश्विक परिस्थितीचा कोरोना प्रार्दूभावाच्या संदर्भात माहिती घेतल्यास असे लक्षात येते की, सेवा देणाऱ्या पैकी अनेकांना आपले जीव या कोरोना व्हायरस मुळे गमवावे लागले आहे. यामध्ये डॉक्टर्स, नर्स, पोलिस आणि इतर शासकीय आणि निमशासकीय सेवेतील कर्मचारी देखील या महामारीमुळे कोरोना बाधींताच्या संपर्कात आल्यामुळे आपले जीव गमावले आहेत. अशा घटना अनेक सेवा कार्य करणाऱ्या विभागात घडलेल्या आहेत.



Scanned by CamScanner

कोरोना व्हायरसमुळे सर्वाधिक तात्काळ सेवा देणाऱ्या शासकीय आणि निमशासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्याला आपले जीव गमवावे लागले आहे. कारण जास्तीत जास्त वेळ लोकांच्या संपर्कात आल्यामुळे कोरोनाचा प्रसार आणि बाधीत व्यक्तीच्या सपंर्कात आल्यामुळे कर्मचारी बाधीत होवून सेवेत सातत्य ठेवल्यामुळे स्वत: आरोग्याकडे लक्ष न दिल्यामुळे जीव गमवावे लागले. अशा अनेक तात्काळ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्या मृत्यूला सामोरे जावे लागले आहेत. त्याच वेळी कोरोना विषयी प्रत्येक व्यक्ती मध्ये मिडियाच्या माध्यमातून भितीचे वातावरण फार मोठया प्रमाणात पसरविल्यामुळे देखील अनेकांनी आपले प्राण सोडले आहे.

सेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक व्यक्तींच्या कुटुंबीयांना त्या समाजव्यवस्थेत अनेक अडचणींना सामोरे जावे लागले आहेत. यावेळी त्याना सामाजिक परिणामांचे चटके देखील अनुभव आले आहेत. समग्र समाज कोरोना बाधींत कुटुंबापासून दूर जातो, आणि त्यावेळी एक सामाजिक विषमता त्या समुदायात दिसून येवू लागते. खरे तर अशा वेळी आधार देण्याची गरज असते, परंतु बाधीत व्यक्तीच्या कुटुंबापासून लोक दूर जातात. तेव्हा मात्र कुटुंबाची परिस्थिती अत्यंत वाई झालेली असते. म्हणून आज गरज आहे की, समग्र समाजाची विचारधारा बदलणे व बाधीत कुटुंबाला आधार देणे अत्यंत गरजेचे आहे.

अशाप्रकारे कोरोना महामारीमुळे जागतिक मानव जातीवर झालेला सामाजिक परिणामांचा आढावा घेता येईल. कारण की, जागतीक महामारीची समस्या कोणत्याही एका देशाला आलेली नसून ती सर्व जगातील देशांमध्ये आलेली आहे. यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झालेला आहे. तसेच आर्थिक व्यवस्था डबघाईला आलेली आहे, तसेच इतर अनेक समस्यांना मानवी समूह तोंड देत आहे. परंतु या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासन आणि सरकारच्या माध्यमातून कठोर असे निर्णय घेवून समाजव्यवस्था सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

संदर्भ :

१. world Health Organization Web portal.
२. शासकीय ऑनलाईन माहितीचा आधार.
३. वर्तमान पत्रातील लेखांचा आधार.
४. गुगल सर्च इंजिनद्वारे घेतलेली माहिती.



Scanned by CamScanner